विक्रीकर मुख्यालय / पुनर्रचना कक्ष,
८ वा मजला, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई ४०० ०१०.

वाचा: १. शा.नि. वित्त विभाग क्र. विकआ-१२०२/प्र.क्र.२५/विक्रीकर (प्रशा-४), दि.१२.११.२००२.
२. वरील क्रमांकाचे शासन शुध्दीपत्रक दि. २१.११.२००२.
३. शासन शुध्दीपत्रक क्र. मविन्या/१००२/प्र.क्र.२००३/विक्रीकर (प्रशा-४), दि. १३.०३.२००६.
४. शा.नि.क्र. विकआ १२०५/प्र.क्र.११९/वि.प्र.४, दि. ०५.०१.२००७.
५. कार्यालयीन आदेश क्र. अविआ /म.रा./कार्या.निहाय पदे/पुनर्रचना कक्ष/प्र.क्र.३/ब-१०१ मुंबई दि. ०७.०७.२००७.
६. शासन निर्णय क्र. विकवि १२११/प्र.क्र.२९१/वि.प्र.४, मुंबई दि. १८.११.२०११.

कार्यालयीन आदेश

विषय:- विक्रीकर विभागाच्या पुनर्रचना आढाव्यानंतर कार्यालयनिहाय, कार्यशाखानिहाय व संवर्गनिहाय पदांचे वितरण.

क्र. अविआ/म.रा./कार्या.निहाय पदे/पुनर्रचना कक्ष/प्र.क्र.५८/ब-३७८ मुंबई, दिनांक:- 07/12/2012

वरील संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये, संक्रमण कालावधीमध्ये विक्रीकर विभागासाठी १०,०२६ पदे मंजूर करण्यात आली होती. त्याव्यतिरिक्त दि. १३.०३.२००६ च्या शासन निर्णयान्वये विक्रीकर न्यायाधिकरणाचे दोन अतिरिक्त खंडपीठांसाठी आठ पदे मंजूर करण्यात आली होती. संदर्भ क्र. ५ च्या कार्यालयीन आदेशानुसार विक्रीकर विभागाच्या पुनर्रचनेनंतर कार्यालयनिहाय पदांचे सुधारित वितरण व पदनामात सुधारणा व त्याअनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारीनिहाय पदवाटप मंजुरीचे तक्ते घोषित करण्यात आले होते.

२. विभागाच्या संक्रमण कालावधीअंती संदर्भ क्र. ४ मधील दि. ०५.०१.२००७ च्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या पदांचा (पुनर्रचनेचा) आढावा घेण्यात आला. पुनर्रचना आढावा समितीमार्फत सर्व विभागाकडून तसेच महाविकास शाखेकडून कार्यशाखानिहाय व ठिकाणनिहाय माहितीचे संकलन करण्यात येऊन, मनुष्यबळ वाटपासंबंधी, कार्यशाखाप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचेशी चर्चा करुन व कार्यशाखांच्या कार्यनिहाय कार्यपध्दतीसंबंधात वेळोवेळी प्रसृत करण्यात आलेल्या परिपत्रकांच्या आधारे निकष तयार करण्यात आले. सदर निकषांचा वापर करुन, कार्यशाखानिहाय व ठिकाणनिहाय निर्माण होणाऱ्या कामास अनुसरुन मनुष्यबळाची परिगणना करण्यात आली व पुनर्रचना आढावा व त्याअनुषंगाने मनुष्यबळाच्या फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला.

३. विक्रीकर खात्याच्या पुनर्रचना आढाव्याच्या प्रस्तावास व त्याअनुषंगाने ९८४२ पदांना संदर्भ क्र. ६ वरील दि. १८.११.२०११ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली आहे. त्यामध्ये विभागातील मुख्य करप्रशासन संवर्गातील पदांची संख्या ठरविली असून, मुख्य करप्रशासनाशी संबंधित संवर्गांचा आढावा घेऊन पदे मंजूर केली आहेत. विभागाच्या पुनर्रचना आढावा प्रस्तावात लघुलेखक, लघुटंकलेखक, इतर किरकोळ संवर्ग व वर्ग-४ चे संवर्गातील पदांचा आढावा घेतला नसल्याने, सध्या या संवर्गातील पदे शासनाने २००२ मध्ये मंजूर केलेल्या आकृतीबंधाप्रमाणेच कायम ठेवली आहेत.

४. शासनाने दि. १८.११.२०११ च्या शासन निर्णयान्वये ९८४२ पदांसह मंजूर केलेला नवीन पुनर्रचना आराखडा विचारात घेऊन, सदर शासन निर्णयातील परिच्छेद-१४ अन्वये शासनाने दिलेल्या अधिकारान्वये, विक्रीकर विभागामधील सध्या अस्तित्वात असलेल्या व नव्याने मंजूर झालेल्या कार्यालयांना/कार्यशाखांना सोबतच्या प्रपत्र-अ आणि प्रपत्र-ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे संवर्गनिहाय व कार्यशाखानिहाय पदे मंजूर करण्यात येत आहेत. शासनाने पुनर्रचना आढाव्याअंती मंजूर केलेली मुख्य करप्रशासन विषयक संवर्गातील एकूण मंजूर पदे प्रपत्र-अ मध्ये दर्शविली आहेत. मात्र लघुलेखक, लघुटंकलेखक, वर्ग-४ चे इतर विविध संवर्ग व इतर किरकोळ संवर्गांचा पुनर्रचनेत आढावा घेतला नसल्याने, या संवर्गातील सध्याच्याच मंजूर पदांचे फेरवाटप करून, पदनामासह कार्यालयनिहाय एकूण मंजूर पदे (मुख्य करप्रशासन विषयक संवर्ग व इतर संवर्ग) प्रपत्र-ब मध्ये दर्शविली आहेत.

प्रारंभ दिनांक:

५. सोबतच्या प्रपत्र-अ आणि प्रपत्र-ब मध्ये मंजूर केलेली कार्यालयनिहाय पदे ही दि. ०१.०१.२०१२ पासून अस्तित्वात येतील, म्हणजेच सध्याची कार्यालयनिहाय पदे दि. ३१.१२.२०११ नंतर अस्तित्वात राहणार नाहीत. त्याऐवजी या आदेशान्वये मंजूर केलेली पदे अस्तित्वात येतील.

कार्यालयांची फेररचना:

६. करदात्यांची सोय, भौगोलिक अंतरे, प्रशासकीय सुविधा व विक्रीकर विभागीय कार्यालयांना पुरेसे कामकाज मिळून, प्रभावी नियंत्रणाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे क्षेत्रीय व विभागीय कार्यालयांची फेररचना करून, शक्यतो भौगोलिकदृष्ट्या जवळ असणारे विभाग व निम्नस्तरीय कार्यालये परिशिष्ट-१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे क्षेत्रीय कार्यालयास जोडण्यात येत आहेत.

७. पुणे व नागपूर क्षेत्रांतील विभागीय कार्यालयांची फेररचना करण्यात येत आहे. पुणे क्षेत्रातील कोल्हापूर व सोलापूर या दोन विभागांवरील नियंत्रणासाठी कोल्हापूर येथे नवीन क्षेत्रीय कार्यालय स्थापन करण्यात येत आहे. पुणे क्षेत्रातील नाशिक व धुळे विभाग व नागपूर क्षेत्रातील औरंगाबाद विभाग या तीन विभागांवरील नियंत्रणासाठी नाशिक येथे नवीन क्षेत्रीय कार्यालय स्थापन करण्यात येत आहे. तसेच सध्याच्या नागपूर क्षेत्रातील औरंगाबाद विभाग वगळून उर्वरित नागपूर, अमरावती व नांदेड विभागांचा समावेश नागपूर क्षेत्रात करण्यात येत आहे. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयावर अपर विक्रीकर आयुक्त यांचे नियंत्रण व पर्यवेक्षण असेल.

८. पुणे येथील विक्रीकर कार्यालयाचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हा असेल, व या कार्यालयाची फेररचना मुंबई विक्रीकर कार्यालयाच्या धर्तीवर करण्यात येत आहे. अपर विक्रीकर आयुक्त हे पुणे विक्रीकर कार्यालयाचे प्रमुख असतील व त्यांच्या मदतीसाठी कार्यशाखानिहाय विक्रीकर सहआयुक्त असतील.

९. ठाणे व कोकणभवन (रायगड विभाग) विक्रीकर विभागांच्या कार्यक्षेत्रात फेररचना करुन व्यापाऱ्यांच्या व प्रशासनाच्या सोयीसाठी नवी मुंबई हा ठाणे विक्रीकर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील भाग कोकणभवन, सीबीडी-बेलापूर या विक्रीकर कार्यालयास जोडण्यात येत आहे. यापुढे ठाणे विक्रीकर कार्यालयाचे कार्यक्षेत्र, नवी मुंबई हा भाग वगळून असेल, तर कोकणभवन (सीबीडी-बेलापूर) या विक्रीकर कार्यालयाचे कार्यक्षेत्र, नवी मुंबई हा भाग तसेच रायगड जिल्हयातील पनवेल, उरण, कर्जत व खालापूर हे तालुके असे राहील.

१०. अलिबाग (रायगड जिल्हयाचे मुख्यालय) येथे नवीन विक्रीकर कार्यालय स्थापन करण्यात येत आहे. या कार्यालयाचे कार्यक्षेत्र रायगड जिल्हयातील पनवेल, उरण, कर्जत व खालापूर हे तालुके वगळून उर्वरित रायगड जिल्हा असे राहील.

विविध करकायद्यांच्या प्रशासनासाठी विविध कार्यालयांमधील नियंत्रण साखळी:

११. मुंबई येथील कार्यालयांसह विविध क्षेत्रीय कार्यालयांमधील प्रशासनाची नियंत्रण साखळी स्पष्ट करण्यासाठी विविध क्षेत्रीय कार्यालयांचे चार स्तरांमध्ये वर्गीकरण करता येईल. ते पुढीलप्रमाणे:-

अ) आयुक्त कार्यालय व विशेष विक्रीकर आयुक्त कार्यालय

ब) सर्व अपर विक्रीकर आयुक्त, मुंबई यांची कार्यालये, अपर विक्रीकर आयुक्त, पुणे विक्रीकर कार्यालय व अपर विक्रीकर आयुक्त, ठाणे, कोल्हापूर, नाशिक व नागपूर यांची क्षेत्रीय कार्यालये.

क) इतर विभागीय कार्यालये.

ड) इतर कार्यालये.

विक्रीकर विभागाअंतर्गत, विक्रीकर आयुक्त, अपर विक्रीकर आयुक्त व विक्रीकर सहआयुक्त तसेच विक्रीकर मुख्यालय, क्षेत्रीय कार्यालये, विभागीय कार्यालये व इतर कार्यालयामधील प्रशासकीय नियंत्रण साखळी तक्ता क्र. १ ते ८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल.

आयुक्त कार्यालय:-

१२. विक्रीकर आयुक्त हे संपूर्ण राज्यात, विक्रीकर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध करकायदयांच्या प्रशासनाचे संचालन करतील. त्यासाठी त्यांना विक्रीकर मुख्यालयातील विविध अधिकारी तक्ता क्र.-२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मदत करतील. आयुक्त कार्यालयात विशेष विक्रीकर आयुक्त व अपर विक्रीकर आयुक्त खालीलप्रमाणे कामकाज पाहतील.

विशेष विक्रीकर आयुक्तः

१३. विक्रीकर आयुक्त यांचेकडील कामाचा भार लक्षात घेता, काही ठराविक शाखांच्या नियंत्रणासाठी अपर विक्रीकर आयुक्त (आस्था) यांचे कार्यक्षेत्र वाढवून त्यांच्या सध्याच्या पदनामाऐवजी विशेष विक्रीकर आयुक्त असे पदनाम करण्यात येत आहे. ते संपूर्ण राज्यासाठी आस्थापनाविषयक बाबींचे कामकाज पाहतील तसेच त्यांचेकडे अन्वेषण, सर्वेक्षण, सीमा तपासणी नाके, महाविकास, आर्थिक बुध्दिसंपदा विभाग (Economic Intelligence Unit) आणि प्रशिक्षण व प्रसिध्दी या कार्यशाखांचे/कार्यासनांचे पर्यवेक्षण, नियंत्रण व प्रशासन असेल.

मुख्य दक्षता अधिकारीः

१४. विक्रीकर विभागातील दक्षता कक्षाच्या प्रमुख पदी मुख्य दक्षता अधिकारी असतील. गृहखात्याअंतर्गत येणारे विशेष पोलिस महानिरीक्षक हे मुख्य दक्षता अधिकारी म्हणून काम पाहतील.

अपर विक्रीकर आयुक्त (व्हॅट) १ ते ३:

१५. अपर विक्रीकर आयुक्त (व्हॅट) १ ते ३, हे व्हॅटसंबंधीच्या धोरणात्मक बाबींचे कामकाज पाहतील व त्यांचेकडे त्यांच्या अधिपत्याखालील मुंबईतील विविध व्हॅट कार्यशाखांचे पर्यवेक्षण, नियंत्रण व प्रशासनाची जबाबदारी असेल. तसेच या कार्यशाखांकरिता ते संपूर्ण राज्याचा मुख्य समन्वय व नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

अपर विक्रीकर आयुक्त (व्यवसायकर):

१६. अपर विक्रीकर आयुक्त (व्यवसायकर) हे व्यवसायकर, वसुली व मुंबई विक्रीकर कायद्यासंबंधीच्या धोरणात्मक बाबींचे कामकाज पाहतील व त्यांचेकडे मुंबईतील व्यवसायकर, वसुली व मुंबई विक्रीकर कायदा या कार्यशाखाचे पर्यवेक्षण, नियंत्रण व प्रशासनाची जबाबदारी असेल. तसेच या कार्यशाखांकरिता ते संपूर्ण राज्याचा मुख्य समन्वय व नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

याशिवाय आदेशासोबत जोडलेल्या तक्ता क्र. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विक्रीकर सहआयुक्त विविध कार्यासाठी आयुक्तांच्या थेट नियंत्रणाखाली राहतील.

अपर विक्रीकर आयुक्त, पुणेः

१७. पुणे विक्रीकर कार्यालयाची फेररचना मुंबई विक्रीकर कार्यालयाच्या धर्तीवर करुन या कार्यालयाला स्वतंत्र कार्यालयाचा दर्जा देण्यात आलेला आहे. अपर विक्रीकर आयुक्त, पुणे हे त्यांचे अधिपत्याखाली विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) पुणे, विक्रीकर सहआयुक्त (मोठे करदाते कक्ष) १ व २, विक्रीकर सहआयुक्त (व्यवसाय लेखा परीक्षण), विक्रीकर सहआयुक्त (परतावा लेखा परीक्षण), विक्रीकर सहआयुक्त (अपिले) १ व २ व विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर) यांचे कामावर नियंत्रण, समन्वय व पर्यवेक्षण करतील.

अपर विक्रीकर आयुक्त, ठाणे क्षेत्र:

१८. ठाणे क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यकक्षेत ठाणे शहर विभाग, ठाणे ग्रामीण (पालघर) विभाग व रायगड विभागांचा समावेश असेल. अपर विक्रीकर आयुक्त, ठाणे क्षेत्र हे त्यांच्या क्षेत्रातील व्हॅट, केंद्रीय विक्रीकर कायदा, मुंबई विक्रीकर कायदा, ऐषआराम कर कायदा, व्यवसायकर कायदा व विभागामार्फत राबविण्यात येणारे इतर करकायदे यांचे प्रशासन तसेच विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कामावर नियंत्रण व पर्यवेक्षण करतील.

अपर विक्रीकर आयुक्त, कोल्हापूर क्षेत्र:

१९. कोल्हापूर क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यकक्षेत कोल्हापूर व सोलापूर विभागांचा समावेश असेल. अपर विक्रीकर आयुक्त, कोल्हापूर क्षेत्र हे त्यांच्या क्षेत्रातील व्हॅट, केंद्रीय विक्रीकर कायदा, मुंबई विक्रीकर कायदा, ऐषआराम कर कायदा, व्यवसायकर कायदा व विभागामार्फत राबविण्यात येणारे इतर करकायदे यांचे प्रशासन तसेच विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कामावर नियंत्रण व पर्यवेक्षण करतील.

अपर विक्रीकर आयुक्त, नाशिक क्षेत्र:

२०. नाशिक क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यकक्षेत नाशिक, धुळे व औरंगाबाद विभागांचा समावेश असेल. अपर विक्रीकर आयुक्त, नाशिक क्षेत्र हे त्यांच्या क्षेत्रातील व्हॅट, केंद्रीय विक्रीकर कायदा, मुंबई विक्रीकर कायदा, ऐषआराम कर कायदा, व्यवसायकर कायदा व विभागामार्फत राबविण्यात येणारे इतर करकायदे यांचे प्रशासन तसेच विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कामावर नियंत्रण व पर्यवेक्षण करतील.

अपर विक्रीकर आयुक्त, नागपूर क्षेत्र:

२१. नागपूर क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यकक्षेत नागपूर, अमरावती व नांदेड विभागांचा समावेश असेल. अपर विक्रीकर आयुक्त, नागपूर क्षेत्र हे त्यांच्या क्षेत्रातील व्हॅट, केंद्रीय विक्रीकर कायदा, मुंबई विक्रीकर कायदा, ऐषआराम कर कायदा, व्यवसायकर कायदा व विभागामार्फत राबविण्यात येणारे इतर करकायदे यांचे प्रशासन तसेच विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कामावर नियंत्रण व पर्यवेक्षण करतील.

ठाणे, कोल्हापूर, नाशिक व नागपूर येथील अपर विक्रीकर आयुक्त हे त्यांच्या क्षेत्रातील सर्व विभागीय विक्रीकर सहआयुक्तांच्या कामकाजाच्या देखरेखीबरोबरच क्षेत्रीय विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर), विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कामावर पर्यवेक्षण, प्रशासन व नियंत्रण ठेवतील. तसेच आस्थापनाविषयक बाबी हाताळतील. अंतर्गत लेखा परीक्षण शाखेवर क्षेत्रीय अपर विक्रीकर आयुक्त यांचे फक्त प्रशासकीय नियंत्रण राहील व आयुक्त कार्यालयाचे कार्यकारी नियंत्रण राहील.

विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर) ठाणे, कोल्हापूर, नाशिक व नागपूर यांची क्षेत्रीय कार्यालये:-

२२. विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर) ठाणे, कोल्हापूर, नाशिक व नागपूर हे त्यांच्या क्षेत्रातील व्यवसायकर कायद्यांच्या कामकाजावर नियंत्रण व पर्यवेक्षण करतील. क्षेत्रीय अपर विक्रीकर आयुक्त यांचे त्यांचेवर प्रशासकीय

व कार्यकारी नियंत्रण राहील. तसेच अपर विक्रीकर आयुक्त (व्यवसायकर) हे राज्यातील व्यवसायकर कायद्यासाठी मुख्य समन्वय व नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

विभागीय कार्यालये:-

२३. विभागीय पातळीवर (मुंबई व पुणेव्यतिरिक्त) विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) हे विभागाचे प्रमुख असतील व त्यांचे विभागातील नोंदणी, धारिणी विभाग, मध्यवर्ती भांडार कक्ष, समुपदेशन कक्ष, सर्वेक्षण, विवरण, वसुली, मुंबई विक्रीकर कायदा, मोठे करदाते कक्ष, ७०४ कक्ष, मुद्देनिहाय लेखा परीक्षण, व्यवसाय लेखा परीक्षण, परतावा लेखा परीक्षण, सामुहिक प्रोत्साहन योजना, तपासणी ज्ञाप कक्ष, वेतन कक्ष, प्रशिक्षण व महाविकास, सीमा तपासणी नाके व अन्वेषण या कार्याशाखांवर तसेच इतर सर्व अनुषंगिक कामावर प्रत्यक्ष प्रशासकीय व कार्यकारी नियंत्रण राहील. तसेच अंतर्गत लेखा परीक्षण व व्यवसायकर या कार्यशाखांवर त्यांचे फक्त प्रशासकीय नियंत्रण राहिल.

इतर कार्यालये

२४. कल्याण, नालासोपारा, अलिबाग, सातारा, सांगली, रत्नागिरी, ओरस, मालेगांव, अहमदनगर, जळगांव, जालना, चंद्रपूर, गोंदिया, यवतमाळ, अकोला, खामगांव व लातूर या १७ विक्रीकर कार्यालयांचे, विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट प्रशासन) हे कार्यालयप्रमुख असतील व ते संबंधित कार्यालयातील सर्व कार्यशाखांवर थेट नियंत्रण ठेवतील.

बार्शी, उस्मानाबाद, नंदुरबार, बीड, गडचिरोली, वर्धा, भंडारा, वाशिम, परभणी व हिंगोली या १० विक्रीकर कार्यालयांचे, सहाय्यक विक्रीकर आयुक्त (व्हॅट प्रशासन) हे कार्यालयप्रमुख असतील व ते संबंधित कार्यालयातील सर्व कार्यशाखांवर थेट नियंत्रण ठेवतील.

इतर वैशिष्टये:

विक्रीकर विभागाच्या आढाव्याअंती खाली नमूद केलेल्या सध्याच्या तात्पुरत्या स्वरुपातील कार्यशाखांना कायमस्वरूपी मंजुरी देण्यात येत आहे.

२५. नमुना ७०४ कक्ष: सध्या तात्पुरत्या स्वरुपातील या कक्षाकडून, (मोठे करदाते कक्षातील व्यापाऱ्यांव्यतिरिक्त) नमुना ७०४ संबंधितील कामे हताळली जातात. या कक्षामार्फत नमुना ७०४ न भरणाऱ्या व्यापाऱ्यांना तसेच सदोष नमुना ७०४ अहवालसंबंधात नोटिसा काढणे, सनदी हिशोबनीस/लेखा परीक्षकांनी नमुना ७०४ मध्ये दाखविलेल्या देय करासंबंधी नोटिसा काढणे व वसुलीसाठी पाठपुरावा करणे तसेच केंद्रीय विक्रीकर कायद्यांतर्गत निर्धारणा आदेश पारित करणे व सदोष नमुना ७०४ अहवालासाठी लेखा परीक्षकांना नोटिसा काढणे इत्यादी कामे हताळली जातील. या कक्षास ज्या ठिकाणी पूर्ण वर्ष पुरेल एवढे काम आहे त्या ठिकाणी मनुष्यबळ देऊन कायमस्वरूपी मंजुरी देण्यात येत आहे. ज्या ठिकाणी नमुना ७०४ कक्षासाठी पुरेशा

कामाअभावी मनुष्यबळ देण्यात आलेले नाही, त्या ठिकाणी व्यवसाय लेखा परीक्षण अथवा मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखेतील अधिकारी नमुना ७०४ अहवालांच्या परीक्षणांचे व केंद्रीय विक्रीकर कायद्याखालील निर्धारणांचे काम पाहतील.

२६. <u>तपासणी ज्ञाप कक्ष</u>: मूल्यवर्धित करकायद्यांतर्गत व्यापाऱ्याने खरेदीवर भरलेल्या विक्रीकराची पूर्ण वजावट देण्यात येते. त्यामुळे व्यापाऱ्यांच्या चुकीच्या वजावटीद्वारे महसूल चोरीवरील नियंत्रणासाठी, तपासणी ज्ञाप कक्षामार्फत वजावट मागितलेला कर शासकीय कोषागारात भरला आहे याची खात्री करुन घेतली जाते. या कक्षाचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन, तात्पुरत्या स्वरुपातील या कक्षाला विभागीय पातळीपर्यत स्वतंत्र मनुष्यबळ देऊन कायमस्वरुपी मंजुरी देण्यात येत आहे. ज्या कार्यालयात तपासणी ज्ञाप कक्षासाठी स्वतंत्र मनुष्यबळ देण्यात आले नाही, त्या ठिकाणी परतावा लेखा परीक्षण अथवा सामुहिक प्रोत्साहन योजनेसाठीचे विक्रीकर निरीक्षक तपासणी ज्ञापचे काम पाहतील.

२७. <u>सामुहिक प्रोत्साहन योजना</u>: सामुहिक प्रोत्साहन योजनेखालील व्यापाऱ्यांना शासनाकडून कर सवलती दिल्या जातात, त्यांच्यावरील प्रभावी नियंत्रणासाठी ज्या कार्यालयात सामुहिक प्रोत्साहन योजनेखालील व्यापारी आहेत व पुरेसे काम आहे, त्या ठिकाणी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी पुरेशा कामाअभावी सामुहिक प्रोत्साहन योजनेसाठी स्वतंत्र मनुष्यबळ देण्यात आले नाही त्या ठिकाणी परतावा लेखा शाखेतील अधिकारी ते काम पाहतील.

२८. <u>मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा:</u> आर्थिक बुध्दिसंपदा विभागाकडून (Economic Intelligence Unit) नमुना ७०४ अहवाल, विवरण, नोंदणी, आयात-निर्यात इत्यादी माहितीच्या पृथक्करणातून निदर्शनास आलेल्या मुद्यांबाबत अतिशीघ्रगतीने कार्यवाही व वसुली करण्यासाठी व मर्यादित लेखा परीक्षणासाठी मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा नव्याने निर्माण करण्यात येत आहे. या कार्यशाखेस विभागीय पातळीपर्यत स्वतंत्र मनुष्यबळ देण्यात आले आहे. ज्या इतर कार्यालयात स्वतंत्र मनुष्यबळ देण्यात आले नाही त्या ठिकाणी व्यवसाय लेखा परीक्षण अधिकाऱ्यांकडून हे काम हाताळले जाईल.

<u>सध्याच्या कार्यशाखांमध्ये खालील वैशिष्टयपूर्ण बदल करण्यात येत आहेत</u>

२९. <u>नोंदणी शाखा</u>: या शाखेअंतर्गत प्रत्यक्ष नोंदणी दाखला देणे, धारिणी विभाग, मध्यवर्ती भांडार कक्ष व समुपदेशन कक्ष या उपशाखा येतात. ज्या कार्यालयात सर्व उपशाखांना पुरेसे काम आहे त्या ठिकाणी प्रत्येक उपशाखेला स्वतंत्र मनुष्यबळ देण्यात आले आहे. तसेच ज्या कार्यालयात उपरोक्त चार उपशाखांमध्ये दिलेल्या लक्ष्यांकाएवढे/पुरेसे काम नाही, त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार दोन किंवा तीन किंवा चार उपशाखा मिळून एका अधिकाऱ्याकडे काम देण्यात आलेले आहे. तसेच समुपदेशन भेटीदरम्यान व्यापाऱ्यांच्या अनोंदीत कालावधीच्या करदायित्त्वाची निर्धारणा तसेच ज्या व्यापाऱ्यांची प्रतवारी कमी (High risk rating) असेल अशा व्यापाऱ्यांचे धंद्याचे लेखा परीक्षणासाठी आवश्यक त्या कार्यालयासाठी सहाय्यक विक्रीकर आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांची पदे देण्यात आली आहेत.

३०. वसुली शाखा: मुंबई विक्रीकर कायदा व इतर कायद्यांखालील जुन्या प्रलंबित थकबाकी प्रकरणांची संख्या व त्यात समाविष्ट असलेली एकूण प्रलंबित वसुली यांचा विचार करुन व व्हॅटअंतर्गत वसुली शाखेकडून जुन्या प्रलंबित वसुलीस कमी प्राधान्य दिले जाण्याची शक्यता विचारात घेऊन, व्हॅटअंतर्गत वसुली व मुंबई विक्रीकर कायदा व इतर जुन्या कायद्यांतर्गतील वसुलीसाठी दोन स्वतंत्र प्रवाह निर्माण करण्यात येत आहेत. विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) यांनी त्यांच्या विभागातील मुंबई विक्रीकर कायद्यांतर्गतील प्रलंबित कामाचा आढावा घेऊन, ज्या ठिकाणी उपलब्ध मनुष्यबळास पुरेसे काम नाही, त्या ठिकाणी मुंबई विक्रीकर कायद्यांतील अनुषंगिक शिल्लक कामासाठीच्या मनुष्यबळास जुन्या प्रलंबित थकबाकी वसुलीचे काम दयावे. म्हणजेच जुन्या कायद्यांतर्गतील वसुलीसाठीचे स्वतंत्र मनुष्यबळ, मुंबई विक्रीकर कायद्याखालील अनुषंगिक शिल्लक कामासाठीचे मनुष्यबळ व व्हॅटअंतर्गतील वसुली शाखेसाठीचे मनुष्यबळ हे सांघिकपणे काम पाहतील.

३१. व्यवसाय लेखा परीक्षण: सध्या व्यवसाय लेखा परीक्षण, परतावा लेखा परीक्षण व मोठे करदाते कक्ष या तीनही शाखांसाठी विभागीय पातळीपर्यंत मनुष्यबळ देण्यात आले आहे. पुनर्रचना आढाव्याअंती विभागीय कार्यालय व त्याअंतर्गत असलेली विक्रीकर कार्यालये/व्यापारी याच्यातील भौगोलिक अंतरे, तेथे पोहोचण्यासाठी लागणार प्रवासाचा वेळ व खर्च, तसेच व्यापाऱ्याला व त्याच्या प्रतिनिधीला कागदपत्राची पूर्तता करण्यासाठी, विभागीय कार्यालयापर्यंत येण्यासाठी होणारा प्रवासाचा त्रास याचा विचार करुन, तसेच प्रशासकीय सुलभतेसाठी व्यवसाय लेखा परीक्षण, परतावा लेखा परीक्षण व मोठे करदाते कक्ष या तीनही कार्यशाखांसाठीचे मनुष्यबळ आवश्यक त्या सर्व कार्यालयांत मंजूर करण्यात येत आहे.

ज्या कार्यालयात व्यवसाय लेखा परीक्षणसाठी एक विक्रीकर उपआयुक्तांचे पद देण्यात आले आहे परंतु परतावा लेखा परीक्षण शाखेसाठी स्वतंत्र विक्रीकर उपआयुक्त पद देण्यात आले नाही, अशा कार्यालयांत विक्रीकर उपआयुक्त (व्यवसाय लेखा परीक्षण) हे त्या ठिकाणच्या परतावा लेखा परीक्षणाचेही काम पाहतील.

३२. परतावा लेखा परिक्षण: ज्या कार्यालयात परतावा लेखा परिक्षणसाठी एक विक्रीकर उपआयुक्तांचे पद देण्यात आले आहे परंतु व्यवसाय लेखा परीक्षण शाखेसाठी स्वतंत्र विक्रीकर उपआयुक्त देण्यात आले नाही, अशा कार्यालयात विक्रीकर उपआयुक्त (परतावा लेखा परीक्षण) हे त्या ठिकाणच्या व्यवसाय लेखा परीक्षणाचेही काम पाहतील.

३३. मोठे करदाते कक्ष: मोठे करदाते कक्षांतर्गत असणाऱ्या प्रकरणात अंतर्भूत असलेला महसूल व त्यांच्या गुंतागुंतीच्या व्यवसाय लेखा परीक्षणाचा विचार करता, या शाखेत विक्रीकर उपआयुक्तांची पदे मंजूर करण्यात येत आहेत. ज्या ठिकाणी (नालासोपारा, अलिबाग, रत्नागिरी, ओरस, मालेगांव, गोंदिया, यवतमाळ, खामगांव, अकोला व लातूर) पुरेशा व्यापारी संख्येअभावी मोठे करदाते कक्ष या शाखेस स्वतंत्र विक्रीकर उपआयुक्त देण्यात आले नाहीत, अशा ठिकाणी त्या कार्यालयांचे प्रमुख विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट प्रशासन) हे मोठे करदाते कक्षातील प्रकरणांत लेखा परीक्षण करतील. ज्या १० विक्रीकर कार्यालयांमध्ये सहाय्यक विक्रीकर आयुक्त दर्जाचे व्हॅट प्रशासनप्रमुख आहेत, त्या कार्यालयांतर्गत येणाऱ्या मोठे करदाते कक्षातील व्यापाऱ्यांच्या लेखा परीक्षणाचे काम संबंधित विक्रीकर सहआयुक्त यांनी नजीकच्या विक्रीकर उपआयुक्तांकडे सोपवावे.

मोठे करदाते कक्षात काही व्यापाऱ्यांची उलाढाल प्रचंड मोठया प्रमाणात असते (उदा. तेल कंपन्या, काही बहुराष्ट्रीय कंपन्या) व अशा प्रकरणात एका विक्रीकर उपआयुक्ताला पूर्ण प्रकरणाची तपासणी करणेसाठी खूप जास्त वेळ लागतो, म्हणून मोठया व अधिक गुतागुंत असलेल्या प्रकरणात सांघिक कामाची आवश्यकता आहे. त्यामुळे अशा प्रकरणांच्या पडताळणीसाठी मुंबई येथे १० व पुणे येथे ४ विक्रीकर अधिकारी, विक्रीकर उपआयुक्त यांना लेखा परीक्षणात सहाय्य करण्यासाठी देण्यात येत आहेत.

मोठे करदाते कक्षांतर्गत असलेल्या व्यापा-यांचे, विक्रीकर विभाग राबवित असलेल्या सर्व कायद्यांखालील लेखा परीक्षण/निर्धारणा, मोठे करदाते कक्षाकडूनच हाताळले जातील.

३४. अन्वेषण: मुल्यवर्धित करप्रणाली अंमलात आल्यानंतर या प्रणालीचा गैरफायदा घेऊन करचोरी करणाऱ्या व्यापाऱ्यांचे प्रमाण वाढीस लागले आहे. त्यामुळे पुनर्रचना आढाव्याअंती अन्वेषण शाखेचे मनुष्यबळ वाढवून बळकटीकरण करण्यात येत आहे. मुंबईत अन्वेषण अ व ब या दोन कार्यशाखांमध्ये प्रत्येकी तीन विक्रीकर उपआयुक्त व २१ सहाय्यक विक्रीकर आयुक्त असतील. अन्वेषण अ मधील एक विक्रीकर उपआयुक्तांसह ७ सहाय्यक विक्रीकर आयुक्त, जलद अन्वेषण पथक (Fast Investigation Team) म्हणून काम पाहतील. महाराष्ट्रातील अनिवासी व्यापाऱ्यांसाठी अन्वेषण ब शाखेत एक सहाय्यक विक्रीकर आयुक्त व एक विक्रीकर अधिकाऱ्याचे पद देण्यात आले आहे. अन्वेषण शाखेस मुंबईबाहेर विभागीय पातळीपर्यंत मनुष्यबळ देण्यात आले आहे. तेथील विक्रीकर उपआयुक्त हे त्यांचे अधिपत्याखालील सहाय्यक विक्रीकर आयुक्तांवर नियंत्रण ठेवतील.

३५. अपिले: अपिल आदेशांतील निर्णयांचा परिणाम भविष्यातील महसुलावर होत असल्याने व अशा आदेशांची गुणवत्ता अत्युच्च राहण्याच्या दृष्टीने, अपिल प्रकरणे हाताळण्यासाठी अनुभवी व वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांची गरज लक्षात घेऊन, अपिल प्रकरणांच्या गुणवत्तापूर्ण निपटाऱ्यासाठी यापुढे फक्त विक्रीकर सहआयुक्त या संवर्गातील १७ पदे मंजूर करण्यात येत आहेत. विभागातील सर्व विक्रीकर उपआयुक्त, सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी यांनी पारित केलेल्या वैधानिक आदेशाविरुध्द विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांच्याकडे अपिल दाखल करता येईल. तसेच विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांच्या आदेशाविरुध्द विक्रीकर न्यायाधिकरणाकडे दाद मागता येईल. म्हणजेच विभागातील सध्याच्या दोन स्तरातील [विक्रीकर उपआयुक्त (अपिले) व विक्रीकर सहआयुक्त (अपिले)] अपिल प्रणालीऐवजी, एक स्तर [विक्रीकर सहआयुक्त (अपिले)] अपिल प्रणालीस मान्यता देण्यात येत आहे.

३६. व्यवसायकर: राज्यातील व्यवसायकर कायद्यांचे प्रशासन समन्वय व नियंत्रण हे मुख्यालयातील अपर विक्रीकर आयुक्त (व्यवसायकर) यांचेकडे असेल. क्षेत्रीय स्तरांवर व्यवसायकर कायदा प्रशासनासाठी विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर) यांची ६ पदे (मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, नाशिक व नागपूर) मंजूर करण्यात येत आहेत. मुंबई व पुणे येथील विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर) वगळता, इतर क्षेत्रीय विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर) यांचे त्यांचे क्षेत्रातील व्यवसायकर अधिकाऱ्यांवर कार्यकारी नियंत्रण (Functional control)

असेल तर संबंधित विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) यांचे प्रशासकीय नियंत्रण (Administrative control) असेल.

३७. <u>इतर कायदे</u>: ऐषआराम कर, प्रवेश कर, उस खरेदी कर या कायद्यांखालील व्यापारी, मुल्यवर्धित कर कायद्यांतर्गतही नोंदीत व्यापारी असल्यामुळे, या कायद्यांचे प्रशासन मुंबई, रायगड, ठाणे, कल्याण, पालघर, नालासोपारा, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, नाशिक, अहमदनगर, जळगाव, औरंगाबाद, नांदेड व नागपूर या कार्यालयांतर्गत व्यवसाय लेखा परीक्षण शाखेतील, प्रथम क्रमांकाचे विक्रीकर उपआयुक्त पाहतील आणि मालेगांव, धुळे, जालना, लातूर, चंद्रपूर, यवतमाळ व खामगाव या कार्यालयांतर्गत प्रथम क्रमांकाचे सहाय्यक विक्रीकर आयुक्त पाहतील. अलिबाग, सोलापूर, रत्नागिरी, अमरावती व अकोला या कार्यालयांतर्गतील विक्रीकर विभाग राबवित असलेल्या इतर करकायद्यांचे प्रशासन परतावा लेखा परीक्षण शाखेतील प्रथम क्रमांकाचे विक्रीकर उपआयुक्त पाहतील व ओरस व गोंदिया या कार्यालयांतर्गत प्रथम क्रमांकाचे सहाय्यक विक्रीकर आयुक्त पाहतील.

तसेच उस्मानाबाद, बार्शी, नंदुरबार, बीड, गडचिरोली, वर्धा, भंडारा, वाशिम, परभणी व हिंगोली या १० विक्रीकर कार्यालयांतर्गतील विक्रीकर विभाग राबवित असलेल्या इतर करकायद्यांचे प्रशासन व्यवसाय लेखा परीक्षण शाखेतील प्रथम क्रमांकाचे विक्रीकर अधिकारी पाहतील. चिटफंड कायदयाखालील व्यापाऱ्यांच्या प्रशासनासाठी आवश्यक त्या ठिकाणी मुल्यवर्धित करप्रणालीअंतर्गतील एका अधिकाऱ्याला स्वतंत्र आदेशाद्वारे प्राधिकृत केले जाईल.

३८. <u>महाविकास</u>: महाविकास कक्ष हा विभागाच्या संपूर्ण संगणक प्रणालीचे व्यवस्थापन, नियंत्रण व देखभाल करणारा महत्त्वाचा कक्ष असल्याने प्रत्येक विक्रीकर कार्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विषयक कामाचे सुसूत्रीकरण व शंका निरसनासाठी, विभागीय पातळीवर सहायक विक्रीकर आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याचे पद त्या विभागांतर्गतील सर्व विक्रीकर कार्यालयातील महाविकासविषयीचे शंका निरासन व प्रशिक्षणासाठी देण्यात येत आहे. त्या पदावरील अधिकारी विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) यांचे नियंत्रणाखाली काम पाहतील.

या कक्षातील कामकाज संगणकीय प्रणालीविषयीचे तांत्रिक कामकाज असल्यामुळे या कक्षासाठी दोन विक्रीकर उपआयुक्त व चार सहाय्यक विक्रीकर आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांची पदे प्रतिनियुक्तीने माहिती व तंत्रज्ञान विभागतील अधिकाऱ्यांमधून समान वेतन श्रेणी/समकक्ष पदावर घेण्यास किंवा कंत्राटी पध्दतीने भरण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

३९. <u>विधी व न्यायालयीन प्रकरणे शाखा</u>: विक्रीकर न्यायाधिकरणांची ५ खंडपीठे व प्रलंबित न्यायालयीन प्रकरणाची संख्या लक्षात घेता विधी व न्यायालयीन प्रकरणे शाखेतील मनुष्यबळात वाढ करण्यात येत आहे. तसेच या शाखेसाठी एक विक्रीकर उपआयुक्त दर्जाचे पद समान वेतनश्रेणीत/समकक्ष पदावर विधी व न्याय विभागामार्फत समन्वय व मार्गदर्शनासाठी प्रतिनियुक्तीद्वारे घेण्यास मंजुरी देण्यात येत आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर व औरंगाबाद खंडपीठांतील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी त्या ठिकाणी प्रत्येकी एक सहाय्यक विक्रीकर आयुक्तांचे पद देण्यात आले आहे.

४०. आर्थिक बुध्दिसंपदा कक्ष (Economic Intelligence Unit): हा कक्ष विभागाचा केंद्रबिंदू असून, व्यापाऱ्यांनी दाखल केलेली विवरणपत्रके, नमुना ७०४ अहवाल, व्यापाऱ्यांची नोंदणी शाखेकडील माहिती, केंद्र व राज्य सरकार यांचे विविध विभागांकडून प्राप्त झालेली माहिती तसेच बाजारातील घडामोडींची व त्यातील कल यांची माहिती संकलित करुन, तिचे विश्लेषण करण्याचे काम EIU कडून केले जाते. सर्व माहितीचे पृथक्करण व विश्लेषणाअंती, विसंगती आढळलेल्या कर चुकवेगिरीच्या सभाव्य प्रकरणाची निवड, अन्वेषण, मुद्देनिहाय लेखा परीक्षण, व्यवसाय लेखा परीक्षण इत्यादी शाखांसाठी करण्याची जबाबदारी या विभागाकडे आहे. या विभागाचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन, या विभागातील मंजूर पदसंख्येव्यतिरिक्त २५% एवढी अतिरिक्त पदे स्वतंत्ररित्या भरतीद्वारे वित्तीय व आर्थिक विश्लेषक किंवा सांख्यिकीय विश्लेषक किंवा संगणक अभियंता व तत्सम शाखांमधील/प्रवाहांमधील उमेदवारांमधून कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे.

४१. अंतर्गत लेखा परिक्षण: विभागाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतींचे आणि कायदे व नियम यांचे उल्लंघन/पायमल्ली होत असल्यास त्यावर अंकुश ठेवणे, महसुलहानीची प्रकरणे शोधून महसूल संरक्षित करणे तसेच विभागाच्या कार्यशाखांच्या कार्यपध्दतींचे अंतर्गत लेखा परीक्षण करुन त्यातील त्रुटी, कमतरता शोधणे तसेच त्यात गुणात्मक बदल सुचविणे ही अंतर्गत लेखा परीक्षण शाखेची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. या शाखेची कार्यकक्षा ही सर्व कार्यशाखा/कार्यालयांसह आयुक्त व विशेष विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालयातील सर्व कार्यासने अशी राहील. या शाखेसाठी विक्रीकर उपआयुक्त, सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी यांची पदे देण्यात आली असून, विभागीय पातळीपर्यंत या शाखेचे अस्तित्त्व असेल. संबंधित विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) यांचे या कार्यशाखेवर केवळ प्रशासकीय नियंत्रण राहिल तर मुख्यालयातील विक्रीकर सहआयुक्त (अंतर्गत लेखा परीक्षण) यांचे कार्यकारी नियंत्रण राहील.

४२. मुंबई विक्रीकर कायदा: मुंबई विक्रीकर कायदयाअंतर्गत शिल्लक असलेल्या निर्धारणा, महालेखाकारांचे आक्षेप, पुनर्स्थापित प्रकरणे, अपिल व न्यायाधिकरणातील प्रकरणे, चूक दुरुस्ती आदेश, फेरनिर्धारणा, पुनर्विलोकन, प्रलंबित वसुली व इतर अनुषंगिक कामासाठी, पुढील तीन वर्षांसाठी या शाखेस २६४ इतके मनुष्यबळ देण्यात येत आहे. मुंबई विक्रीकर कायदा व त्या कालावधीतील वसुलीच्या कामावर नियंत्रण व पर्यवेक्षणासाठी मुंबई येथे विक्रीकर सहआयुक्त यांचे पद देण्यात आले आहे. तर मुंबईबाहेर, मुंबई विक्रीकर कायद्यांतर्गत दिलेल्या मनुष्यबळावर, विक्रीकर सहआयुक्त (व्यवसायकर) यांचेऐवजी, संबंधित विभागीय विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) यांचे कार्यकारी व प्रशासकीय नियंत्रण राहील. ज्या कार्यालयांत निर्धारणेचे काम संपले आहे, अशा कार्यालयातील मुंबई विक्रीकर कायद्यासाठीचे मनुष्यबळ प्रलंबित वसुलीचे काम पाहील. तसेच सदर मनुष्यबळ व मुंबई विक्रीकर कायद्याच्या वसुलीसाठीचे मनुष्यबळ, प्रलंबित वसुलीचे काम सांघिकपणे पाहतील.

४३. कार्यालयीन व्यवस्थापन: मुंबई कार्यालयाव्यतिरिक्त इतर अपर विक्रीकर आयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विक्रीकर कार्यालयामध्ये या आदेशान्वये मंजूर केलेल्या मनुष्यबळाचा व तेथील कार्यालयीन

व्यवस्थेचा आढावा घेऊन, त्यांचे स्तरावरील व्यवस्थापनविषयक कामे दि. ३१.१२.२०११ पुर्वी पूर्ण करावीत. तसेच विक्रीकर मुख्यालय स्तरावरील कामांसाठीचे प्रस्ताव तात्काळ विशेष विक्रीकर आयुक्त यांचेकडे पाठवावेत.

४४. पदनामेः मुंबई विक्रीकर कायद्यातील प्रलंबित कामाच्या निपटाऱ्यासाठी ठेवावयाच्या पदांची पदनामे पुर्वीचीच राहतील. व्हॅट, व्यवसायकर व मुंबई विक्रीकर कायदयातील कार्यालयनिहाय पदनामे व त्या पदांना देण्यात आलेले महाविकास सांकेतांक दर्शविणारे प्रपत्र-ब सोबत जोडले आहे. तसेच कार्यालयनिहाय इतर संवर्ग (वर्ग-४, लघुलेखक व इतर किरकोळ संवर्ग) व त्या संवर्गातील पदांची संख्या व त्यांचे महाविकास सांकेतांकही प्रपत्र-ब मध्ये दर्शविण्यात आले आहेत.

४५. पुनर्रचना आढाव्याअंती मंजूर करण्यात आलेल्या मुख्य करविषयक संवर्गातील ९८४२ पदांचे कार्यालयनिहाय, कार्यशाखानिहाय व संवर्गनिहाय पदवाटप प्रपत्र-अ मध्ये दर्शविले आहे.

४६. नवीन मंजूर झालेली विक्रीकर कार्यालये (अलिबाग, जिल्हा रायगड) व नवीन मंजूर झालेली क्षेत्रीय कार्यालये (कोल्हापूर व नाशिक) यांसह एकूण सर्व क्षेत्रीय व विभागीय कार्यालये व त्यांना संलग्न विक्रीकर कार्यालये व जिल्हे यांचा तपशील सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये दर्शविला आहे.

४७. पुनर्रचना आढाव्यानंतर विविध कार्यालयामधील प्रशासकीय नियंत्रण साखळी दर्शविणारे तक्ते क्र. १ ते ८ सोबत स्वतंत्ररित्या जोडण्यात आले आहेत.

(संजय भाटिया)
विक्रीकर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

परिशिष्ट - 9

विक्रीकर विभागातील क्षेत्रीय कार्यालये, विभागीय कार्यालये व त्यांचेशी संलग्न विक्रीकर कार्यालये दर्शविणारे विवरणपत्र (सध्याची आणि नवीन)

सध्याची कार्यालये				प्रस्तावित कार्यालये			
क्षेत्रीय कार्यालये	विभागीय कार्यालये	संलग्न असलेले		क्षेत्रीय कार्यालये	विभागीय कार्यालये	संलग्न असलेले	
		विक्रीकर कार्यालय	जिल्हा			विक्रीकर कार्यालय	जिल्हा
	१.माझगांव	माझगांव	मुंबई शहर	#	१.माझगांव	माझगांव	मुंबई शहर
			मुंबई उपनगरे				मुंबई उपनगरे
ठाणे क्षेत्रीय कार्यालय	२. रायगड	रायगड	रायगड	ठाणे क्षेत्रीय कार्यालय	२. रायगड	रायगड	रायगड
						अलिबाग @	
	३.ठाणे शहर	ठाणे शहर	ठाणे		३.ठाणे शहर	ठाणे शहर	ठाणे
		कल्याण				कल्याण	
	४.ठाणे ग्रामीण	नालासोपारा	ठाणे		४.ठाणे ग्रामीण	नालासोपारा	ठाणे
		पालघर				पालघर	
पुणे क्षेत्रीय कार्यालय	५. पुणे	पुणे	पुणे	#	५. पुणे	पुणे	पुणे
	६.सोलापूर	सोलापूर	सोलापूर	* कोल्हापूर क्षेत्रीय कार्यालय	६.सोलापूर	सोलापूर	सोलापूर
		उस्मानाबाद	उस्मानाबाद			उस्मानाबाद	उस्मानाबाद
		बार्शी	सोलापूर			बार्शी	सोलापूर
	७. कोल्हापूर	कोल्हापूर	कोल्हापूर		७. कोल्हापूर	कोल्हापूर	कोल्हापूर
		सातारा	सातारा			सातारा	सातारा
		सांगली	सांगली			सांगली	सांगली
		रत्नागिरी	रत्नागिरी			रत्नागिरी	रत्नागिरी
		ओरस	सिंधुदुर्ग			ओरस	सिंधुदुर्ग
	८. नाशिक	नाशिक	नाशिक	* नाशिक क्षेत्रीय कार्यालय	८. नाशिक	नाशिक	नाशिक
		मालेगांव	नाशिक			मालेगांव	नाशिक
		अहमदनगर	अहमदनगर			अहमदनगर	अहमदनगर
	९. धुळे	धुळे	धुळे		९. धुळे	धुळे	धुळे
		जळगांव	जळगांव			जळगांव	जळगांव
		नंदुरबार	नंदुरबार			नंदुरबार	नंदुरबार
नागपूर क्षेत्रीय कार्यालय	१०. औरंगाबाद	औरंगाबाद	औरंगाबाद		१०. औरंगाबाद	औरंगाबाद	औरंगाबाद
		बीड	बीड			बीड	बीड
		जालना	जालना			जालना	जालना
	११. नांदेड	नांदेड	नांदेड	नागपूर क्षेत्रीय कार्यालय	११. नांदेड	नांदेड	नांदेड
		परभणी	परभणी			परभणी	परभणी
		लातुर	लातुर			लातुर	लातुर
		हिंगोली	हिंगोली			हिंगोली	हिंगोली
	१२. नागपूर	नागपूर	नागपूर		१२. नागपूर	नागपूर	नागपूर
		चंद्रपूर	चंद्रपूर			चंद्रपूर	चंद्रपूर
		गोंदिया	गोंदिया			गोंदिया	गोंदिया
		गडचिरोली	गडचिरोली			गडचिरोली	गडचिरोली
		वर्धा	वर्धा			वर्धा	वर्धा
		भंडारा	भंडारा			भंडारा	भंडारा
	१३. अमरावती	अमरावती	अमरावती		१३. अमरावती	अमरावती	अमरावती
		यवतमाळ	यवतमाळ			यवतमाळ	यवतमाळ
		खामगांव	बुलढाणा			खामगांव	बुलढाणा
		अकोला	अकोला			अकोला	अकोला
		वाशिम	वाशिम			वाशिम	वाशिम

@ नवीन विक्रीकर कार्यालये

* नवीन क्षेत्रीय कार्यालये

स्वतंत्र कार्यालये